आहे.सततच्या पाणी कपातीने नागरिकांवर पाणी टंचाईचे संकट कोसळले आहे. नुकत्याच झालेल्या आढावा बैठकीत उपलब्ध महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# घर व्यवसायातील मदतनीस महिलांचा सन्मान




सन्मानित करण्यात आलेल्या ओम रुग्णालयाच्या महिला कर्मचारी.

**■ डोंबिवली, प्रतिनिधी**

वैद्यकीय व्यवसायातील व्यस्त जीवनशैलीत घर आणि व्यवसायात अमूल्य मदत करणाऱ्या महिलांचा सत्कार महिला डॉक्टरांकडून करण्यात आला.जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने डोंबिवली जिमखाना येथे ओम हॉस्पिटलच्यावतीने सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला.त्यात विशेष कार्य करणाऱ्या पाच महिलांचा सत्कार करण्यात आला.

भारती मुळे, पूनम आंब्रे, शालन कांबळे, जॉली नायर, कविता सुर्वे या महिलांचा डॉ.वंदना धाकतोडे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. शल्यचिकित्सक डॉ.धाकतोडे यांच्या ओम हॉस्पिटलमध्ये या महिला जनसेवेचे काम करतात.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.धाकतोडे म्हणाल्या की, डोंबिवलीत सुमारे १८० कुटुंबांनी एकत्र येऊन डॉक्टरांचा ग्रुप तयार केला आहे. दरवर्षी चांगले उपक्रम या मार्फत केले जातात. शहरात महिला फॅमिली डॉक्टरांची संख्या जास्त आहे. त्यांना मदतीचा हात देणाऱ्या घर-व्यवसायातील मदतनीस महिलांचा सत्कार होणे गरजेचे होते त्यामुळे हा कार्यक्रम आयोजित करुन त्यांना देखील आपुलकीने जोडणे हीच भावना असल्याचे त्या म्हणाल्या.

अॅलोपथी, आयुर्वेद, होमियोपथी या भिन्न चिकित्सा पध्दतीतील महिला डॉक्टरांनी ओम हॉस्पिटलच्यावतीने आयोजित केलेल्या महिला दिना निमित्ताने एकत्र येत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. रोगाचे निदान करून कडू औषध रूग्णाना देणाऱ्या डॉक्टरांनी ठसकेबाज लावणी सादर करून तर कव्वालीची नजाकत सादर करीत उपस्थितांची मने जिंकली. कला सादर करणाऱ्या डॉक्टरांना उत्तेजन देताना सगळ्याच महिला डॉक्टरांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. डॉ.चारुमित्रा रानडे, डॉ.माधुरी बहिरट आणि डॉ. रुपाली भिंगारे यांचे विशेष सहकार्य लाभले.